दृष्टिक्षेपात

# वर्सोवा-विरार सागरी सेतूला जपान सहकार्य करणार : फडणवीस

टोकियो : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जपानचे केंद्रीय आर्थिक, व्यापार आणि उद्योग मंत्री यासुतोशी निशिमुरा यांची भेट घेतली. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, मेट्रो ३ प्रकल्पातील अडथळे दूर केल्याबद्दल त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतानाच वर्सोवा-विरार सागरी सेतू (सी-लिंक) ला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन जपान सरकारच्या वतीने देण्यात आले. या वेळी निशिमुरा म्हणाले की, जपान जी-७ चे नेतृत्व करीत असून, भारत जी-२० चे नेतृत्व करीत आहे. त्यामुळे हे दोन देश जागतिक पातळीवर मोठी भूमिका बजावू शकतात. जपान सरकार सातत्याने नवीन संशोधनाला चालना देत असून, 'एमएसएमई'ला सहकार्य करीत आहे.